**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे**
**६३वे न्यायालय, अंधेरी, मुंबई**
**कलम ३५५ फौजदारी संहिता प्रक्रिया**
**पिठासीन अधिकारी : द. पां. कासट**

**निशाणी क्र.१८**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारदार** | : | महाराष्ट्र शासन<br>तर्फे— सहार पोलिस स्टेशन, मुंबई |
| **सरकारी अधियोक्ता** | : | श्रीमती रुपाली पवार |
| **आरोपी** | : | मोहम्मद मुस्लिम मोहम्मद इस्माईल<br>वय : २३ वर्षे, व्यवसाय : काही नाही.<br>राहणार : गांव—सेरगाह, पोस्ट—कुंदा,<br>जिल्हा—प्रतापगढ, उत्तर प्रदेश—२३०२०४. |
| **वकिल** | : | श्री. संजय तिवारी |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | ०२/०२/२०१९ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | : | ०३/०२/२०१९ |
| दोषारोपपत्र दिनांक | : | ११/०२/२०१९ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | : | २६/०२/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | २५/०७/२०२५ |
| प्रकरण निकालासाठी ठेवल्याचा दिनांक | : | २३/०६/२०२६ |
| निकाल दिनांक | : | २३/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | : | २३/०६/२०२६ |

| आरोपी चा क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा/निर्दोष मुक्तता | शिक्षा | कलम ४२८ प्रमाणे प्रकरण सुरू असतांना न्यायाधीन बंदी असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मोहम्मद मुस्लिम मोहम्मद इस्माईल | ०२/०२/२०१९ | ०६/०२/२०१९ | भा.दं.वि. कलम ४६५, ४६८, | निर्दोष मुक्तता | —— | —— |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ४७१, ४२० | | | |

## तपासलेल्या साक्षीदारांची यादी

**१. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार :**

| अ.क्र. | नांव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| १ | भटू रमेश पाटील | तक्रारदार |
| २ | सविता रतन ठोंबरे | तपासी अधिकारी |

**२. आरोपीतर्फे साक्षीदार, असतील तर :**

| अ.क्र. | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| — | — | — |

**३. न्यायालयीन साक्षीदार, असतील तर :**

| अ.क्र. | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| — | — | — |

**अभियोगपक्ष, आरोपी अथवा न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणींची यादी**

**१. अभियोगपक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | नि.क्र.८ | फिर्याद |
| २ | नि.क्र.९ | पासपोर्ट |
| ३ | नि.क्र.१० | बोर्डिंग पास |
| ४ | नि.क्र.११ | इंडियन एअरलाइन्सने दिलेले पत्र |
| ५ | वस्तू क्र.अ | परतीचे तिकीटाची प्रत |
| ६ | नि.क्र.१४ | प्रोडक्शन पंचनामा |
| ७ | नि.क्र.१५ | ठाणे डायरी उतारा |
| ८ | नि.क्र.१६ | जेट एअरवेजला केलेला पत्रव्यवहार |

**२. आरोपीपक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| — | — | — |

**३. न्यायालयीन निशाणी क्रमांक :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| — | — | — |

**४. महत्वाच्या वस्तु**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| — | — | — |

**न्या य नि र्ण य**

(दिनांक २३/०६/२०२६ रोजी पारित)

प्रस्तुत आरोपी भारतीय दंड संहितेच्या कलम ४६५, ४६८, ४७१, ४२० अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या दोषारोपाच्या संपरीक्षेला सामोरा जात आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :**

२. आरोपीने गैरमार्गाने दिनांक २०/०२/२०१९ रोजीचे दुबई ते मुंबई अशा प्रवासाचे विमान क्र.९डब्ल्यु—५२५ चे परतीचे बनावट तिकीट मिळवून दिनांक ०२/०२/२०१९ रोजी मुंबई ते शारजाह असा प्रवास करण्याचा प्रयत्न करुन इमिग्रेशन विभागाची फसवणूक केली. परिणामी, फिर्यादीने आरोपीविरुद्ध सहार पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या अनुषंगाने आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४६५, ४६८, ४७१, ४२० अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयासाठी गुन्हा क्र. ५७/२०१९ नोंदविण्यात आला.

३. या गुन्हयाचे तपास अधिकारी श्रीमती सविता ठोंबरे (पोलीस उपनिरीक्षक) यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीला

अटक करुन त्याचा जबाब नोंदवला. कागदपत्रांचा पंचनामा तयार करुन तपासाअंती आरोपीविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझ्या विद्वान पदीय पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम ४६५, ४६८, ४७१ व ४२० अन्वये (नि.क्र. ६) येथे दोषारोप निश्चित करुन तो त्याला वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने गुन्हा कबुल केला नाही व प्रकरण पुढे चालविण्याची मागणी केली.

५. तद्नंतर अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये गुन्हयाशी संबंध जोडणाऱ्या आलेल्या बाबींचा खुलासा देण्याची संधी आरोपीला त्याच्या फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये नोंदविण्यात आलेल्या (नि.क्र. १७) निवेदनादरम्यान देण्यात आली. सदर निवेदनामध्ये आरोपीने अभियोग पक्षाचे संपूर्ण प्रकरण नाकारले आहे. त्याने त्याच्या बचावात कोणताही साक्षीदार तपासलेला नाही.

६. अभियोग पक्षाची हकीकत, प्रकरणातील पुरावे व युक्तिवाद पाहता खालील मुद्दे विचाराधीन येतात. त्यावरील निष्कर्ष त्यांच्या समोर त्याखालील कारणमिमांसेसह नोंदविण्यात आले आहेत:

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपीने गैरमार्गाने दुबई ते मुंबई अशा प्रवासाचे बनावट परतीचे तिकीट मिळवले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेचे कलम ४६५ प्रमाणे दंडनीय गुन्हा केला ? | नाही |
| २ | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपीने इमिग्रेशन विभागाची फसवणूक करण्याच्या उद्देशाने गैरमार्गाने मिळवलेले परतीचे तिकीट धारण केले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेचे कलम ४६८ प्रमाणे दंडनीय गुन्हा केला ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| ३ | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपीने बनावट परतीचे तिकीट धारण केले व ते खरे असल्याचे भासवले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेचे कलम ४७१ प्रमाणे दंडनीय गुन्हा केला ? | नाही |
| ४ | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपीने बनावट परतीचे तिकीट धारण करुन त्याआधारे मुंबई ते शारजाह असा प्रवास करण्याचा प्रयत्न करुन इमिग्रेशन विभागाची फसवणूक केली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेचे कलम ४२० प्रमाणे दंडनीय गुन्हा केला ? | नाही |
| ५ | अंतिम आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबत**

७. मुद्दा क्र.१ ते ४ याबाबत आलेला पुरावा हा सारखाच असल्याने व ते एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी व सोईसाठी ते एकत्रित चर्चेसाठी घेतलेले आहेत. आरोपीविरुद्धचे दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने दोन साक्षीदारांची साक्ष नोदवलेली आहे.

८. आरोपीने गैरमार्गाने दुबई ते मुंबई अशा प्रवासाचे दिनांक २०/०२/२०१९ रोजीचे विमान क्र.९डब्ल्यु—५२५ चे परतीचे बनावट तिकीट मिळवून दिनांक ०२/०२/२०१९ रोजी मुंबई ते शारजाह असा प्रवास करण्याचा प्रयत्न करुन इमिग्रेशन विभागाची फसवणूक केली हे विनासंशय शाबित करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची आहे.

९. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.१ भटू पाटील याने संबंधित वेळी आरोपी त्याच्या काउंटरवर तपासणीसाठी आला त्यावेळी त्याने आरोपीचे कागदपत्र तपासले असता आरोपीकडे असलेले परतीचे तिकीट बनावट असल्याचे दिसून आले व त्यामुळे त्याने आरोपीला विंग इन्चार्ज यांच्यासमोर हजर केले असता विंग इन्चार्ज यांनी केलेल्या चौकशीदरम्यान ते तिकीट बनावट असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्याने आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केल्याचे कथन केले आहे. त्याच्या उलटतपासादरम्यान त्याने आरोपीकडे मिळून आलेले परतीचे तिकीट हे जेट एअर लाइन्सचे होते असे मान्य केले आहे. पुढे त्याने एअर इंडिया व जेट एअरलाईन्स या दोन वेगवेगळया विमान कंपन्या असल्याचे मान्य करुन जेट एअरवेज या कंपनीने इमिग्रेशन विभागाला कोणतेही पत्र दिलेले नव्हते हे देखील मान्य केलेले आहे.

१०. तद्नंतर अभियोग पक्षाची साक्षीदार क्र.२ सविता ठोंबरे म्हणजे तपासी अधिकारी यांनी दिनांक ०३/०२/२०१९ रोजी फिर्याद दाखल झाल्यानंतर फिर्यादीने दाखल केलेले कागदपत्र जप्त करुन पुढील तपास केल्याचे व तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केल्याचे कथन केले आहे. तथापि या साक्षीदाराने देखील उलटतपासादरम्यान एअर इंडिया व जेट एअरवेज या वेगवेगळया विमान कंपन्या असल्याचे व त्यांचे प्रशासन देखील वेगवेगळे असल्याचे मान्य केले आहे. तिने देखील जेट एअरवेज या कपंनीचे तिकीट बनावट असल्याचे कथन करण्याचा प्रयत्न केला असला तरी सदरचे तिकीट बनावट असल्याबाबतचा कोणताही अहवाल जेट एअरवेज या विमान कंपनीच्या सक्षम अधिका—याने दिलेला नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे.

११. या सर्व परिस्थितीत अभियोग पक्षाच्या दोन्ही साक्षीदारांची साक्ष आहे तशी स्विकारली तरी प्रस्तुत आरोपीने बनावट परतीचे तिकीट

धारण करुन ते खरे असल्याचे भासवून त्याआधारे मुंबई ते शारजाहा असा प्रवास करण्याचा प्रयत्न केला हे दर्शवणारी कोणतीही बाब अथवा कागदपत्रे अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल केलेली नाहीत हे सुस्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे केवळ इमिग्रेशन अधिकारी व तपासी अधिकारी यांनी कोणत्याही सबळ कागदोपत्री पुराव्याशिवाय केलेले आरोपीच्या परतीच्या तिकीटाबाबतचे कथन कदापिही स्विकारार्ह ठरत नाही.

१२. त्यामुळे आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेला त्याने बनावट परतीचे तिकीट धारण करुन परदेशात प्रवास करण्याचा प्रयत्न करुन इमिग्रेशन विभागाची फसवणूक करण्याचा दोषारोप निराधार असल्याची बाब स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे उपलब्ध पुराव्यातून आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेला कोणताही दोषारोप सिद्ध होवू शकत नाही. त्यामुळे विचाराधीन मुद्दे क्र.१ ते ४ यांना ''नकारार्थी'' निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेत.

**<u>वादप्रश्न.क्र.५ बाबत</u>** :

१३. मुद्दे क्र.१ ते ४ च्या अनुषंगाने नोंदविण्यात आलेल्या निष्कर्षांचा विचार करता व आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेला दोषारोप सिद्ध करण्यास अभियोग पक्षाला अपयश आलेले असल्यामुळे आरोपीला निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे. त्या अनुषंगाने मुद्दा क्र.५च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे:

## आदेश

| | |
|---|---|
| (१) | आरोपीची फौजदारी संहिता प्रक्रियेच्या कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ४६५, ४६८, ४७१ व ४२० अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| (२) | आरोपीचे जामिनबंधपत्र व वैयक्तिक जातमुचलके रद्द करण्यात येतात. |

| | |
|---|---|
| (३) | आरोपीने फौजदारी संहिता प्रक्रियेच्या कलम ४३७(अ) अन्वये रुपये १५,०००/— चे नविन जामिनबंधपत्र पुढील सहा महिन्यांसाठी सादर करावे. |
| (४) | प्रकरणातील जप्त मुद्देमाल म्हणजेच भारतीय पासपोर्ट यापुर्वी सुपुर्तनाम्यावर परत करण्यात आलेला नसल्यास तो आरोपीला आवश्यक ती पडताळणी करुन तात्काळ परत देण्यात यावा. |
| (५) | प्रकरणातील उर्वरीत जप्त कागदपत्रे म्हणजेच यु.ए.इ. व्हिजा पेपर, विमान तिकीट व बोर्डिंग पास, इत्यादी मूल्यहिन असल्याने अपील कालावधीनंतर ते नष्ट करण्यात यावेत. |

KASAT DATTAPRASAD PANDURANG
Digitally signed by KASAT DATTAPRASAD PANDURANG
Date: 2026.06.23 17:36:35 +0530

(द. पां. कासट)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

दिनांक : २३/०६/२०२६

६३वे न्यायालय, अंधेरी, मुंबई